| CNR No. MHRG040028932025 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २५/०७/२०२५ |
| | नोंदणी तारीख | : | १९/०८/२०२५ |
| | निकाल तारीख | : | १०/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०० व. ०७ म. १३ दि. |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल-रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**विवाह याचिका क्र.५६४/२०२५**
**निशाणी क्र.११/अ**

**...याचिकाकर्ते क्र.१**

**आणि**

**...याचिकाकर्ते क्र.२**

---

हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) अन्वये संमतीने घटस्फोट मिळणेसाठीची याचिका.

---

याचिकाकर्ते क्र.१ व २ तर्फे विधीज्ञ शंकेश राजेश ठाकरे.

---

## : न्यायनिर्णय :
## (जाहीर दिनांक १०/०३/२०२६)

याचिकाकर्ते क्र.१ व २ यांनी सदरची याचिका हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) अन्वये संमतीने विवाह विच्छेदन होवुन मिळण्याकरीता दाखल केलेली आहे.

२. याचिकाकर्ते क्र.१ व २ यांचे थोडक्यात कथन असे की, त्यांचा विवाह दिनांक ०१/०५/२०२४ रोजी हिंदु धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाला. याचिकाकर्ते यांना सदर लग्नसंबंधातुन कोणतेही अपत्य नाही. विवाहानंतर याचिकाकर्ते यांचेमध्ये मतभेद होऊ लागले. उभयतांमधील मतभेद दूर करण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ झाले. याचिकाकर्ते क्र.१ व २ हे दिनांक १५/०६/२०२४ पासून एकमेकांपासुन विभक्त राहत आहेत. सबब, याचिकाकर्ते यांनी प्रस्तुतची याचिका दाखल केली आहे.

३. याचिकाकर्ते क्र.१ यांनी निशाणी क्र.८ वर तसेच याचिकाकर्ते क्र.२ यांनी निशाणी क्र.९ वर त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, विवाहानंतर त्यांचेमध्ये मतभेद होऊ लागले. त्यांनी यापुढे असे कथन केले आहे की, त्यांच्यात समझोता घडवुन आणण्याचे प्रयत्न करण्यात आले, परंतू त्यांना यश आले नाही म्हणून त्यांनी समजोत्याने व एकमेकांच्या संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे. याचिकाकर्ते यांनी पुरावा संपल्याची पुरशीस निशाणी क्र.१० अन्वये दाखल केली आहे. मध्यस्थांचा अहवाल निशाणी क्र.७ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. याचिकाकर्ते यांच्या पुरावा प्रतिज्ञापत्रातील मजकूर पाहिला असता दोन्ही याचिकाकर्ते दिनांक १५/०६/२०२४ पासून एकत्र राहत नसुन विभक्त

राहत असल्याचे स्पष्ट होते. याचिकाकर्ते यांनी याचिकाकर्ते क्र.१ व २ यांच्या आधारकार्डची प्रत, विवाहाचा फोटो, विवाहाची पत्रिका अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

४. सदरची याचिका याचिकाकर्ते यांनी त्यांना परस्पर संमतीने विवाह विच्छेदन होवुन मिळण्याकरीता दाखल केलेली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी, अट व गैरवाजवी दडपण असल्याचे दिसून येत नाही. ही याचिका नामंजूर करण्यास कोणतेही सबळ कारण दिसून येत नाही. म्हणून सदर याचिका मंजूर करून खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. याचिका मंजूर करण्यात येत आहे.

२. याचिकाकर्ते क्र.१ व याचिकाकर्ते क्र.२ यांचा दिनांक ०१/०५/२०२४ रोजी संपन्न झालेला विवाह हा हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३-ब नुसार आपसी संमतीने प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या दिनांकापासून विच्छेदीत करण्यात येत आहे.

३. येणे प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.03.11 17:54:21 +0530

पनवेल
दिनांक : १०/०३/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.